**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
**'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ००४**
**(दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५८१३३)**
**website : www.ebalbharati.in/ www.balbharati.co.in**


**दिनांक :** ३.३.२०२५

## बालभारतीच्या अनुषंगाने प्रसिद्ध झालेल्या बातम्यांचा खुलासा

मागील काही दिवसांमध्ये महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, संस्थेच्या अनुषंगाने विविध माध्यमांतून बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे खुलासा करीत आहोत.

१) पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम २०२४ अनुसार इयत्ता पहिलीच्या पाठ्यपुस्तक निर्मितीचे काम अंतिम टप्प्यात आहे. समन्वय समितीच्या शिफारशीनुसार सदरच्या पाठ्यपुस्तकांच्या पडताळणीचे काम सुरू असून त्यानुसार सुचवलेल्या बदलांनुसार पाठ्यपुस्तके अंतिम छपाईकरिता पाठवण्यात येतील.

२) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी शासननिर्णयानुसार इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना वह्यांच्या पानांशिवाय विषयनिहाय नियमित पाठ्यपुस्तके नव्याने प्रकाशित करून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच दुसरी ते आठवीची पूर्वीप्रमाणे नियमित विषयनिहाय पाठ्यपुस्तके शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये वेळेवर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

३) मंडळाच्या नियामक मंडळ ठराव क्रमांक ५४००, दिनांक १५/१२/२०२२ अन्वये मंडळातील अ, ब, क संवर्गातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया राबविण्यासाठीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

४) पाठ्यपुस्तक मंडळ आर्थिक संकटात असल्याबाबतची माहिती दिशाभूल करणारी असून आर्थिकदृष्ट्या पाठ्यपुस्तक मंडळ सुस्थितीत आहे.

५) बालभारती 'एस.सी.ई.आर.टी.' मध्ये विलीन करण्याच्या बातमीमध्ये कोणतेही तथ्य नाही.

तरी विनंती करण्यात येते, की माध्यमांतील बातम्यांच्या अनुषंगाने बालभारती या राज्यातील प्रतिष्ठित संस्थेची बदनामी होत असून ती थांबवण्यात यावी. याबाबत कोणताही विपर्यास करण्यात येऊ नये असे आवाहन पाठ्यपुस्तक मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

**(कृष्णकुमार पाटील)**
संचालक,
पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती, पुणे